कायम विना अनुदान.

जा.क्र.माध्य.३(१५)/५ते७/पुवि/एफ४२/०६ -
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 2 JUN 2006

प्रति,
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद पुणे

**विषय : इयत्ता ५ वी चा वर्ग माध्यमिक शाळेत सुरु करण्यास परवानगी देणे बाबत.**
**शाळा:- काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड, हवेली, पुणे**

**संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक : जिप/ शिक्षण/माध्य/ह४/१११/०६, दि. २७/४/०६**
**२. शासन निर्णय क्रमांक एसएसएन-१००२(२५६/२००२)/माशि-१ दिनांक :- २७.६.२००३**
**३. संस्थेचे प्रतिज्ञापत्र दि. २२/३/०४**

उपरोक्त विषयाधिन संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की,या कार्यालयाने इ.८ वी चा वर्ग सुरु करणेस सन२०००-.०१ या शैक्षणिक वर्षापासून मान्यता दिलेली आहे. सदर शाळेत सध्या इ.८ वी ते १० वी चे वर्ग सुरु असून संदर्भ क्रमांक २ अन्वये व संस्थेच्या संदर्भिय पत्र क्रमांक ३ च्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून सदर शाळेस सन जुन २००३ शैक्षणिक वर्षा पासून इ.५ वी चा वर्ग सुरु करण्यांस खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.

## कायम विना अनुदान

१. इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गाची परवानगी ही **कायम विना अनुदान** तत्वावर राहील.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४.इ.५ वी ते ७ वी च्या वर्गाना सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यांत.
५. सदर कायम विनाअनुदान वर्गासाठीच्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतनाची जबाबदारी संस्थेची असेल.
६. भविष्यांत सदर वर्गाना अनुदानाची मागणी करता येणार नाही.

वरील प्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरु केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीच्या वेळी करावी व त्या बाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत. तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रतिलिपी -
१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२ ~~मुख्याध्यापक,~~ काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड, हवेली पुणे
३. निवडनस्ती